MHRT050008582022

# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१६७/२०२२
## मधील नि.१ वरील आदेश

(श्री. नितीन आप्पा नलावडे वि. महाराष्ट्र शासन)

अर्जदार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४५१ प्रमाणे खेड पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर २००/२०२२ मध्ये जप्त महिंद्रा बोलेरो कंपनीची चारचाकी गाडी क्र. MH-12-MW-6906 जिचा चॅसीस नं. MA1WM2GHKG5A49531 व इंजिन नं. GHG4A59107 (संक्षिप्तेकरिता “जप्त गाडी”) ही गाडी मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदारच्या कथनानुसार ते ३३/३ बी गुरुदत्त विहार, फ्लॅट नं. ३, भारती विद्यापीठ, आंबेगाव बुद्रुक, पुणे–४०००४६ येथील रहिवासी आहे व सामनेवाला यांनी अर्जदार यांचे मालकीची गाडी जप्त करुन ती पोलीस स्थानकात ठेवलेली आहे. सदरची गाडी एकाच ठिकाणी उभी राहिल्यास गाडीचे इंजिन गंजून सडून जावून अर्जदार यांचे पैशाचे स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. तसेच ऊन व पावसात ती उभी राहिल्यास त्यांचे मोठे नुकसान होणार आहे. तरी प्रस्तुतची गाडी ही अर्जदार याच्या स्वतःच्या मालकीची असल्याने ती अर्जदार यास परत मिळावी याकरिता अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. या प्रकरणात तपासिक अंमलदार यांनी निशाण क्र.६ व सरकारी वकीलांनी नि. १ वर म्हणणे देवून अर्जदार यांना मुद्देमाल परत देण्याबाबत हरकत घेतलेली नाही. अर्जदार यांना सदरचे वाहन योग्य त्या अटी व शर्थीवर देणेस हरकत नसलेचे त्यांनी कथन केले आहे.

४. अर्जदारने सदर अर्जासोबत अर्जदार याने नि.५/१ वर पंचनाम्याची छायांकित प्रत, नि.५/३ वर ऑनलाईन ड्रायव्हींग लायसन्सची छायांकीत प्रत, नि.५/४ वर अर्जदाराच्या आधार कार्डची छायांकित प्रत, नि.९ वर गाडीचे आर.सी. बुकची

पडताळलेली प्रत, नि.१० वर गाडीचे गाडीच्या विम्याची पडताळलेली प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

५. सदर गाडी ही पोलीसांनी प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केली असल्याची बाब वादातीत नाही. तसेच अर्जदाराने सादर केलेल्या वर नमुद कागदपत्रांवरुन सदर गाडीचा अंतरीम ताबा मिळण्यास अर्जदार पात्र असल्याचे दिसते. या सर्व परिस्थितीचा विचार करता अर्जदारच्या ताब्यात प्रस्तुत प्रकरणी जप्त गाडी देणे योग्य ठरेल. अशा परिस्थितीमध्ये जप्त गाडी ही काही अटी व शर्तींवर अर्जदाराच्या ताब्यात देणे योग्य होईल. म्हणून खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पोलीस निरिक्षक, खेड पोलीस ठाणे, ता.खेड, जि.रत्नागिरी यांना आदेश देण्यात येतो की, जप्त महिंद्रा बोलेरो कंपनीची चारचाकी गाडी क्र. MH-12-MW-6906 जिचा चॅसीस नं. MA1WM2GHKG5A49531 व इंजिन नं. GHG4A59107 ही अर्जदार **श्री. नितीन आप्पा नलावडे** यांना रक्कम रु.४,००,०००/– (रुपये चार लाख फक्त) चे हमीपत्र दिल्यानंतर परत देण्यात यावी.

३. अर्जदाराने जप्त मुद्देमाल ताब्यात मिळाल्यानंतर या केसचा अंतिम निकाल लागेपर्यंत ती कोणालाही विकू नये अथवा सदरच्या गाडीमध्ये कोणताही बदल करु नये.

४. सदर मुद्देमालाचा मे. न्यायालयास जेव्हा जेव्हा चौकशीकामी आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा सदरची गाडी अर्जदारने मे. न्यायालयात स्वखर्चाने हजर करावे.

५. तसेच तपासी अधिकारी यांनी सदर गाडी अर्जदारास परत करण्यापूर्वी या गाडीचे चार बाजूंनी फोटो काढून त्याबाबत पंचनामा करावा. असा पंचनामा व फोटो त्यांचे निगेटीव्हसह तथा योग्य त्या प्रमाणपत्रासह न्यायालयात या आदेशापासून सात दिवसांच्या आत दाखल करावेत. या सर्व प्रक्रियेचा खर्च प्रस्तुत अर्जदाराने करावा.

**६.** या प्रकरणातील कागदपत्रे खेड पोलीस ठाणे, ता.खेड मधील गुन्हा रजिस्टर नं.२००/२०२२ सोबत ठेवण्यात यावेत.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

MANISHA MAHADEO PATIL

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2022.09.30 13:21:18 +0530

**दिनांक – २९/०९/२०२२**

**(मनिषा म. पाटील)**
**न्यायदंडाधिकारी वर्ग–१, खेड**
**ता. खेड, जि. रत्नागिरी.**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | Cri.M.A. No. 167/2022 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. V. V. Bamane |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 29/09/2022 |
| Order signed by Presiding Officer on | : | 29/09/2022 |
| Order uploaded on | : | 30/09/2022 |